# गुरुकृपायोगानुसार साधना

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 卐 | मनोगत | ७ |
| १. | 'साधना' या शब्दाचा अर्थ | ८ |
| २. | गुरु | ८ |
| ३. | गुरुकृपायोग (अर्थ आणि महत्त्व) | १० |
| ४. | गुरुकृपायोगानुसार साधना | १६ |
| ५. | गुरुकृपायोगानुसार करावयाच्या साधनेचा सिद्धांत -'व्यक्ती तितक्या प्रकृती तितके साधनामार्ग' | १६ |
| ६. | गुरुकृपायोगानुसार करावयाच्या साधनेमागील प्रमुख तत्त्वे | १७ |
| ७. | साधनेत होणाऱ्या मूलभूत चुका | ३६ |
| ८. | गुरुकृपायोगानुसार साधनेचे प्रकार | ४० |



| | |
|---|---|
| सनातनचा लघुग्रंथ | सेवेतून शीघ्र आध्यात्मिक उन्नती होण्यासाठी काय करावे ? |

# मनोगत

जीवनातील दुःखांना धैर्याने सामोरे जाण्याचे बळ आणि सर्वोच्च प्रतीचा सतत टिकणारा आनंद केवळ साधनेनेच मिळतो. साधना म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी करावयाचे प्रयत्न. गुरूंच्या कृपेविना साधना करून ईश्वरप्राप्ती करून घेणे अतिशय कठीण असते. गुरुकृपेच्या माध्यमातून ईश्वरप्राप्तीच्या दिशेने वाटचाल होणे, याला 'गुरुकृपायोग' असे म्हणतात. गुरुप्राप्ती होण्यासाठी आणि गुरुकृपा सातत्याने होत रहाण्यासाठी करावयाची साधना म्हणजे 'गुरुकृपायोगानुसार साधना'.

गुरुकृपायोगानुसार साधनेची व्यष्टी साधना (वैयक्तिक उन्नतीसाठीचे प्रयत्न) अन् समष्टी साधना (समाजाच्या उन्नतीसाठीचे प्रयत्न) अशी दोन अंगे आहेत. या दोन्ही अंगांचे विविध पैलू आचरणात आणण्याविषयीचे मार्गदर्शन या लघुग्रंथात केले आहे. त्यानुसार साधना करून प्रत्येक जण गुरुकृपेस पात्र होवो, ही गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**